12/17/23, 6:22 PM about:blank

पुण्य नगरी

# कृषी महाविद्यालयात एड्सदिन



**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

**यवतमाळ :** वसंतराव नाईक कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालायात १ ते १५ डिसेंबरपर्यंत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. एड्स सारख्या महाभयंकर रोगाबद्दल आणि त्यांच्या संक्रमणाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी १९ डिसेंबर रोजी एड्स दिनानिमित्त एड्स जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. एन. डी. पार्लावार यांनी एड्स या आजाराचे समूळ नष्ट करणे, होणारे मृत्यू रोखणे आणि आजाराने ग्रस्त असलेल्या पीडितांना समाजात सामावून घेणे गरजेचे असल्याचे सांगितले. तसेच महाविद्यालयात विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून एड्स जनजागृती केली जाते. महाविद्यालयात स्थापन झालेला रेड रिबन क्लबच्या अनुषंगाने समाजात एड्स विषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा, असे डॉ. पार्लावार यांनी मार्गदर्शन केले. सरफराज सोदागर यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना एड्स व एच. आय. व्ही. होण्याची कारणे, लक्षणे, उपाययोजना व चाचणी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी एड्स प्रतिबंध व नियंत्रण याबाबत सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांना शपथ दिली. महाविद्यालयात एड्ससाठी कार्यरत असलेल्या रेड रिबन क्लबच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून एचआयव्ही विषयी जागरूकता निर्माण व्हावी, म्हणून प्रचार व प्रसार केला. डॉ. अजय राठोड यांनी एड्स जनजागृतीबाबत मार्गदर्शन केले. संचालन तेजस्विनी फरकाडे या विद्यार्थिनींनी केले. प्रास्ताविक व आभार प्रदर्शन प्रा. अंजली गहरवार यांनी केले. यावेळी प्रा. धीरज वसुले, रासेयो कार्यक्रम अधिकारी मंगेश शेटे, साहाय्यक कुलसचिव, डॉ. रवींद्र सातभाई, रूपेश राऊत, डॉ. पी. के. प्रधान व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

Smart Yavatmal Edition
Dec 16, 2023Page No. 02
Powered by : eReleGo.com

about:blank 1/1